# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१५/०८/२०१९
## दि.१४/०८/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २८१/१९,भादविक ३०२ |
| **फिर्यादी** | पो.हवा. कदम, फरासखाना पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | इमामुल सजन शेख,वय-३८ वर्षे,रा.घर नं.९९,धाराव गांव सेक्टर नं.२३,नेरुळ,नवी मुंबई |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०८/२०१९ रोजी ०७/४५ वा.चे पुर्वी जुनी सागर बिल्डींग,चौथा मजला,बुधवार पेठ, पुणे येथील पश्चिम बाजुस असलेल्या घरा मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद इसम इमामुल सजन शेख याने त्याची पत्नी मिना गब्बार काझी शेख,वय-३०, रा.सदर हिचे दुस-या इसमा सोबत ओळखी असल्याचा संशय घेवुन,त्यांचेमध्ये झालेल्या भांडणाचे कारणावरुन,त्याने त्याचेजवळील चाकुने मिना हिचेवर वार करुन,तीस गंभीर जखमी करुन,तीचा खुन केला आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. नावंदे ९९२२०३१००० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८०१/१९,भादविक ३०२,५०६(२),३४,आर्म ॲक्ट ३(२५),क्रिमीनल लॉ अमेंटमेंट क ३ व ७ प्रमाणे |
| **फिर्यादी** | राजेंद्र गुंजाळ,वय-२३ वर्ष,रा.गंगानगर,फुरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | १.एक विधीसंघर्षीत बालक,वय-१७ वर्षे,रा.गंगानगर,फुरसुंगी,पुणे (ताब्यात आहे) व इतर तीन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०८/२०१९ रोजी १८/३० वा. सर्व्हे नं.२२०,दिगंबर कॉलनी,गंगानगर मेन रोड,फुरसुंगी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाऊ मयुर विजय गुंजाळ हा त्याचे मित्र सनी गवळी व अदित्य इंगवले याचेसह आपसांत बोलत थांबले असताना,त्यांचे भागात राहणारे यातील नमुद विधीसंघर्षीत बालक व इतर इसमांनी संगनमत करून,पुर्वी झालेल्या भांडणाचे कारणावरुन,पुन्हा भांडणे करुन,मयुर यास मारहाण करीत असताना,त्यांचे भांडणे सोडविण्यासाठी मध्ये आलेले पंचय्या सोमय्या स्वामी,वय-५८ वर्षे,रा.गंगानगर मेन रोड गल्ली नं.२,फुरसुंगी,पुणे यांचेवर एका इसमाने त्याचेजवळील पिस्तुल मधुन फायरींग करुन जीवे ठार मारले आहे. तसेच सदर ठिकाणी नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण केले आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. रघुनाथ जाधव ९८२२५५५५५४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५५६/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | बापु भंगारेभारती, पो.ना. भारती विद्यापीठ वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | एक इसम,वय-४५ वर्ष,रा.चौधरी पार्क,परांडेनगर,दिघी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०८/२०१९ रोजी १६/१४ वा.चे दरम्यान कात्रज चौक कात्रज,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील खासगी बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी एक अनोळखी इसम,वय-५८ वर्ष यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एम.एस.देशमुख ९७६५३९०९४३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ३२१/१९,भादविक ४०७ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३१ वर्षे,रा.पंराडेनगर,दिघी,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०८/२०१९ रोजी सकाळी १०/०० ते रात्रौ २२/०० वा.चे दरम्यान लॉजी कॅश सोल्युशन प्रा.लिमी. विमाननगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे विमाननगर लॉजी कॅश सोल्युशन प्रा.लिमी. कपंनी विमाननगर,पुणे येथील शाखे मध्ये कपंनीचे रोखपाल यातील नमुद इसम यास विश्वासाने बँकेचे एटीएम मध्ये भरण्यासाठी दिलेले ४२ लाख ५० हजार रुपये रोख रकमेपैकी काही बँकेचे एटीएम बंद असल्याकारणाने १० लाख ५० हजार रुपये परत आणणे अपेक्षित असताना,सदर इसमाने ५ लाख ५० हजार रुपये फिर्यादी यांचे कंपनीतील ऑफिस मध्ये जमा करुन,बाकी उरलेले कपंनीचे ५ लाख रुपयेचा अपहार केला आहे. (सदरचा गुन्हा हा तक्रारी अर्जावरून दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ५७२/१९,भादविक ३५३,३३२ |
| **फिर्यादी** | हरिश पानसंबळ, पो.शि. श्रीरामपुर शहर पोलीस स्टेशन |
| **आरोपी** | आसिफ सलिम पटेल,वय-३२ वर्ष,रा.दांडेकर पुल,दत्तवाडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०८/२०१९ रोजी दुपारी १५/१५ वा. येरवडा मध्यवर्ती कारागृहाचे मुख्य प्रवेश व्दारा समोरील पार्किग मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे अहमदनगर पोलीस दलात श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे पोलीस शिपाई या पदावर असुन,फिर्यादी हे वसीम सलीम पटेल उर्फ दरवेशी यास वर्ग करणेकामी पुणे येरवडा मध्यवर्ती कारागृह,पुणे येथे आरोपी पार्टीसह येरवडा मध्यवर्ती कारागृहाचे पार्किग मध्ये ते त्यांचे सहकारी यांचेसह त्यांचे कर्तव्य बजाविण्यासाठी आले असता,वसीम पटेल याचा भाऊ यातील नमुद इसम आसिफ पटेल हा तेथे येवुन मी माझ्या भावाला जेवण आणले आहे. तुम्ही त्याला जेवण द्या असे म्हणाला त्यावेळी फिर्यादी यांनी त्यास नकार दिल्याचे कारणावरून,तसेच श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन यांनी आसिफ पटेल याचेविरुध्द फटाके वाजले म्हणून कारवाई केली होती त्याचा राग मनात धरून,फिर्यादी यांचेवर हमला करुन त्यांना मारहाण करुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरिक्षक, आर.बी.गिरमकर |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**